Literacy for a Billion

Movie: Oxygen jeev gudmartoy
Year: 2008

Song: Kuthala rasta kuthali walane
Lyricist:

कुठला रस्ता कुठली वळणं
कसला हा अंधार
कसल्या भिंती कसलं घरटं
कसला हा संसार
कापरा वारा बेभान
सारखा घाली थैमान रं
जगण्याच्या या वाटं वरती
दैवाचे विवर
झालं बंद आता देवा
कसला रं आधार

चालून थकलं पाऊल आता
थांबतं मनाज समदं काही
उणउणं झालं झाड पाखराचं
सावली कुठंच आज न्हाई
वणव्याच्या ज्वालांनी घेरल्या दिशा
ठिणग्यांनी सावल्या पेटल्या जशा
जगणा मरणाचा अवतार
कुठला रस्ता कुठली वळणं
कसला हा अंधार
कसल्या भिंती कसलं घरटं
कसला हा संसार
कापरा वारा बेभान
सारखा घाली थैमान रं

जगण्याच्या या वाटं वरती
दैवाचे विवर
झालं बंद आता देवा
कसला रं आधार

जल्माची साऱ्या सांग कहानी
तळहाती तुटलेल्या रेषा
फिरत्यात सारं नशिबाचं फेरं
जगण्याची वणवनती भाषा
कळला ना दिवतीचा
अर्थ हा कुणा
असण्यावर नसण्याचा सुड का पुन्हा
जगणा मरणाचा अवतार
कुठला रस्ता कुठली वळणं
कसला हा अंधार
कसल्या भिंती कसलं घरटं
कसला हा संसार
कापरा वारा बेभान
सारखा घाली थैमान रं
जगण्याच्या या वाटं वरती
दैवाचे विवर
झालं बंद आता देवा
कसला रं आधार

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*